# Jijamata Arts College Darwha Dist.Yavatmal

## Best Practice No-01

## Title: "Uddan" Empowering Girls by life skills

Session 2023-24

Anti ragging Awareness program




Program on women empowerment




Program on women protection




Program organized on women's rights




Skill development program for women



Guidance on ragging




Guidance on protection of women






Program on earn and learn

While doing yoga to stay fit and healthy













Daily Sinhazep

Date 9/2/2024



# रॅगिंगमुळे होतकरू विद्यार्थ्यांची हानी : एपीआय भुसे

दारव्हा

सिंहझेप प्रतिनिधी

स्थानिक नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील अँटी रॅगिंग सेलच्या वतीने बैठकीचे व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्तम बाडे तर मार्गदर्शक म्हणून एपीआय कविता भुसे या उपस्थित होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रीती ठाकरे विचारपीठावर उपस्थित होत्या. या कार्यक्रमाची सुरवात संत गाडगेबाबा व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना एपीआय भुसे यांनी महाविद्यालय जीवनामध्ये रॅगिंग चा प्रकार कसा घडतो व त्याची कशी सुरवात होते याची सविस्तर माहिती देऊन त्यामुळे कित्येक विद्यार्थ्यांनी आपली जीवन यात्रा संपलेली आहे तसेच कित्येकांनी शिक्षण सोडून दिलेले आहे ही घातक प्रथा शैक्षणिक क्षेत्रामध्ये लागलेली कीड होती ती थांबण्याच्या दृष्टिकोनातून शासन स्तरावरून प्रयत्न झाले त्यामुळे आज रॅगिंगचे प्रकार फार कमी प्रमाणात दिसून येत आहे. डॉ. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना सीनियर ज्युनिअर हा भेदभाव न करता समतेच्या तत्त्वाने वागले पाहिजे यावर मार्गदर्शन केले. तर अध्यक्ष भाषणांमधून डॉ.बाडे यांनी अँटी रॅगिंग ही इंजिनिअरिंग मेडिकल डिप्लोमा या मध्ये कार्यरत असून त्यामुळे विद्यार्थ्यांना असंख्य समस्यांना तोंड देऊन जीवन जगावे लागत होते. त्यामुळे उच्च शिक्षणामध्ये खळबळ उडाली ती थांबविण्याच्या दृष्टिकोनातून शासन स्तरावरून प्रयत्न करावे लागले. त्यामुळे आज तिची तीव्रता कमी जाणवते, यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन राणी जाधवनी केले तर प्रास्ताविक आय क्यू एसी समन्वयक डॉ रामधन हिरे यांनी केले आभार प्रदर्शन रविना चव्हाणनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता डॉ. रमेश खंडारे डॉ.राकेश गेडाम पा.कु.रूपाली कणसे नितेश कदम सचिन माटोळे सतीश ससताpe सोमराज लोहकरे विनोद कटाळे शिल्पा लोखंडे अजय चव्हाण स्नेहल जाधव विशाखा कोल्हे साक्षी जाधव अमृता राठोड राखी झंगळे चेतना वाघमारे हरिओम दामोदर दुर्गा पारधी आदींनी परिश्रम घेतले.

Daily Vidarbh Kalyan
Date 26/3/2024

# महिला संरक्षण या विषयावर मार्गदर्शन

## विदर्भ कल्याण/ दारव्हा

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम भुलाई याठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे त्या शिबिर अंतर्गत २५ मार्च रोजी बौद्धिक सत्रामध्ये महिला संरक्षण विषयक कायदे या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून अँड योगिता भुयार व अँड. हेडाऊ हे उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली.

Daily Vidarbh Kalyan
Date 26/3/2024

# महिलाविषयक संरक्षण यावर कार्यक्रम संपन्न

नांदेड- नवसंजिवन शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाचे दत्तक ग्राम भुलाई येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत श्रम संस्कार शिबिराच्या बौद्धिक सत्रामध्ये मार्गदर्शन करताना अॅड.मनोज कावळे यांनी महिलांच्या संरक्षणाच्या संदर्भात विविध कायद्यावर



विवेचन करून कायदा हा कसा श्रेष्ठ आहे याची जाणीव करून दिली. तर अध्यक्ष भाषणांमधुन डॉ. रामधन हिरे यांनी महिलांच्या संरक्षणाकरिता कायदा कसा महत्त्वाचा याची जाणीव करून दिली.

या कार्यक्रमाचे संचालक सुनील कोठे यांनी केले तर आभार प्रदर्शन स्वप्निल जाधव यांनी मानले. याप्रसंगी विचार पिठावरप्रा. डॉ.रमेश खंडारे प्रा. कु. रूपाली कणसे हे उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता रवीण चव्हाण ऋतुजा मोहतुरे तेजस गायकवाड प्राची राऊत पायल राठोड चेतना कचरे राहुल उफाळे मंजुषा सार्वे प्रतिभा साखरकर श्रद्धा पारधी आदी परिश्रम घेत आहे.

Daily Vidarbh Kalyan
Date 16/2/2024

# जिजामाता महाविद्यालयमध्ये कमवा आणि शिका कार्यक्रमाचे आयोजन

नांदेड- नवसंजिवन शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालयातील गृह अर्थशास्त्र विभागाद्वारा कमवा आणि शिका या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी भेळ पाणीपुरी मोतीचुरीचे लाडू नमकीन चिवडा सोनपापडी खारमुरे राजगुरा लाडू तिळाची चकली गुळाची चकली गुलाबजामून आदींचे स्टॉल विद्यार्थिनी लावले होते.



या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना पैसा कसा कमवावा याची जाणीव झाली. या कार्यक्रमाचे आयोजन गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. कु. रूपाली कणसे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.पी. जाधव आणि आयक्युएसी समन्वयक डॉ.रामधन हिरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता डॉ. रमेश खंडारे डॉ. जयवंत जुकरे डॉ. पुरुषोत्तम बांडे डॉ राजेश गेडाम डॉ. प्रीती ठाकरे नितेश कदम सचिन माटोळे विनोद कंठाळे सोमराज लोहकरे सतीश सरतापे महेश राठोड राधा उघडे प्रियंका चव्हाण ऋतुजा मोहतुरे राणी घोडे मेघा शेंदूरकर अक्षदा जयसिंगपूर सुनील कोठे तेजस्विनी चव्हाण राणी जाधव अजय चव्हाण महेश चांदोळे शुभम नांदेडकर माधुरी राठोड रवीना चव्हाण रेवती चौधरी सानिका चौरे सृष्टी अगम गायत्री बानखडे विशाखा कोल्हे राहुल उफाळे सुनील जाधव आदी परिश्रम घेतले.

Daily Hindusthan
Date 18/2/2024

# 'कमवा आणि शिका' कार्यक्रम उत्साहात

**दारव्हा :** स्थानिक नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील गृह अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.पी.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.कु.रुपाली कणसे यांनी केले होते.

या उपक्रमामध्ये बी.ए .भाग एक दोन आणि तीनच्या विद्यार्थ्यांनी सहभागी झाल्या होत्या. त्यांनी एकूण 25 वस्तूचे स्टॉल लावले होते. त्यामध्ये त्यांनी स्वतः बनविलेल्या राखी , कला कुसरीची वस्तू, स्वेटर, पाणीपुरी, कचोरी, सजावटीच्या वस्तू,सोमोसा , मफरेलआदी बाबींचे स्टॉल लावण्यात आले होते.

या उपक्रमाचे कौतुक डॉ. रमेश खंडारे, डॉ. प्रीती ठाकरे, डॉ. रामधन हिरे, डॉ. पुरुषोत्तम बांडे, डॉ. जयवंत जुकरे, डॉ.राजेश गेडाम, नितेश कदम, सचिन माटोळे, सतीश सरतापे,सोमराज लोहकरे, विनोद कंठाळे, सोमराज लोहकरे आदींनी केले.

Daily Sinhazep

Date 17/3/2024

# जिजामातामध्ये योगासनाचे धडे



दारव्हा– जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विद्यार्थ्यांकरिता दत्तक ग्राम भुलाई येथे योगासनाचे विविध प्रकार व त्यामुळे होणारे फायदे हे विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक दाखवण्यात आले. त्यामध्ये मयूर आसन, शीर्षासन, भुजंगासन, ताडासन सूर्यनमस्कार, वृक्षासन, त्रिकोणासन इत्यादीचा समावेश होतो.

या कार्यक्रमाच्या आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत करण्यात आले. त्याच्या यशस्वीतेसाठी डॉ. रमेश खंडारे डॉ. रामधन हिरे प्रा.कु.रूपाली कणसे डॉ. जुकरे पायल पवार अक्षया जयसिंगपुरे सानिका चावरे विशाखा कोल्हे राहुल उफाळे मंजू सार्वे वैशाली सार्वे प्राची राऊत माधुरी राठोड चेतना कचरे पायल राठोड पायल राऊत स्नेहा जाधव राणी राणी जाधव महेश चांदोळे प्रथमेश आडे आदींनी परिश्रम घेतले.

Jijamata Arts College ★ Darwha Dist.Yavatmal ★ 0454

Bhatare

Off.Principal
Jijamata Arts College
Darwha Dist.Yavatmal

## Best Practice No-02

# Title: To create social awareness among students

Environment awareness rally under induction programme



















GPS Map Camera
Darwha, Maharashtra, India
8Q5J+8JV, Darwha, Maharashtra 445202, India
Lat 20.307105°
Long 77.783389°
01/12/23 02:44 PM GMT +05:30




GPS Map Camera
Bhulai, Maharashtra, India
8PR4+5GF, Bhulai, Maharashtra 445202, India
Lat 20.341699°
Long 77.707129°
20/03/24 08:37 AM GMT +05:30


GPS Map Camera
Bhulai, Maharashtra, India
8PR4+5GF, Bhulai, Maharashtra 445202, India
Lat 20.341699°
Long 77.707129°
20/03/24 08:40 AM GMT +05:30


GPS Map Camera
Darwha, Maharashtra, India
8Q4M+C8J, Darwha, Maharashtra 445202, India
Lat 20.307305°
Long 77.783386°
12/08/23 12:16 PM


GPS Map Camera
Darwha, Maharashtra, India
8Q4M+C8J, Darwha, Maharashtra 445202, India
Lat 20.306136°
Long 77.78266°
26/01/24 09:02 AM GMT +05:30


Bhulai, Maharashtra, India
8PR4+5GF, Bhulai, Maharashtra 445202, India
Lat 20.341699°
Long 77.707129°
18/03/24 08:45 AM GMT +05:30

Daily Vidharbh Kalyan
Date 18/8/2023

# जिजामाताद्वारा कलश यात्रेचे आयोजन



**विदर्भ कल्याण / दारव्हा**

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय येथील विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने स्वतंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त मेरी मिट्टी मेरा देश या अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कलश यात्रा काढली माझी माती माझा देश अशा घोषणा देत शहरातून भव्य कलश यात्रा काढली. कलशात प्राचार्य प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी मूठभर माती कलश मध्ये टाकून तो कलश विद्यापीठामुळे सादर करायचा आहे. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. ए.पी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कल्याण प्रभारी डॉ. पुरुषोत्तम बांडे आयक्युएसी समन्वयक डॉ रामधन हिरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ रमेश खंडारे, डॉ. प्रीती ठाकरे, डॉ. जयवंत जुकरे, डॉ. राजेश गेडाम, नितेश कदम, सचिन माटोळे, सतीश सरतापे, विनोद कंठाळे, सोमराज लोहकरे, प्राची राऊत, विशाखा कोल्हे ,महेश चांदोडे, शुभम नांदेडकर, मिथुन राठोड, नरेश वानखडे, कृष्णा राठोड, सुनील कोते, ऋतिक सहारे, प्रथमेश आडे, रविना जाधव, राणी जाधव, माधुरी राठोड , जयश्री पवार, भूमिका चव्हाण, दिपाली रुडे, रवीना ससाने, पल्लवी पारधी, दामिनी जाधव, सपना राठोड, पल्लवी जाधव, स्मृती मस्के, दौलत शिंदे, हर्षा राठोड, स्नेहल डांगरा, अक्षया जयसिंगपूर आदींनी परिश्रम घेतले.

Daily Sinhazep
Date 15/10/2023

# जिजामाता कला महाविद्यालयामध्ये माहिती अधिकार जनजागृती सप्ताह साजरा

**सिंहझेप प्रतिनिधी**



यवतमाळ - स्थानिक जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथे दिनांक ६ ऑक्टोबर ते 12 ऑक्टोबर 2023 या कालावधीत माहिती अधिकार जनजागृती सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला माहितीचा अधिकार कायदा अधिनियम 2005 या कायद्याच्या सकारात्मक वापरासाठी विद्यार्थी वर्गात तसेच समाजात जनजागृती झाली पाहिजे कारण फार मोठ्या मेहनतीने उपोषणे,मोर्चे संप,जन आंदोलने करून हा अधिकार शासनविरोधात भांडणे करून मोठ्या मेहनतीने मिळवलेला आहे आज हा कायदा लागू होऊन 18 वर्षे पूर्ण झालेली आहेत तरीसुद्धा अजूनही पाहिजे त्याप्रमाणात ग्रामीण भागातून अल्पशिक्षित जनतेत विद्यार्थी वर्गात या कायद्याविषयी जनजागृती झालेली नसल्यामुळे या कायद्याबाबत विद्यार्थी वर्गात जनजागृती व्हावी या उद्देशातून दरवर्षी जिजामाता कला महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग मार्फत हा जनजागृती सप्ताह साजरा केला जातो माहितीचा अधिकार जनजागृती सप्ताह 2023 अंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्यात प्रामुख्याने निबंध स्पर्धा,पोस्टर स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा वादविवाद स्पर्धा ,वक्तृत्व स्पर्धा आणि दिनांक 11 ऑक्टोबर 2023 रोजी माहिती अधिकारावर अतिथी व्याख्यान डॉ.व्ही. एस इंगळे राज्यशास्त्र विभाग प्रमुख गोपिकाबाई गावंडे महाविद्यालय उमरखेड यांचे माहिती अधिकार कायदा: महत्व , गैरप्रकार आणि उपायोजना या विषयावर व्याख्यान झाले .असे विविध कार्यक्रम राबवून विद्यार्थी वर्गात माहिती अधिकार अधिनियम 2005 या कायद्याविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला सर्व स्पर्धेत प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान परीक्षेचे पुस्तक देऊन पारितोषक देऊन गौरव करण्यात येणार आहे.

माहिती अधिकार जनजागृती सप्ताह 2023 अंतर्गत विविध कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. ए.पी जाधव आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. आर.यु.हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. जे.पी जुकरे यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्रा. डॉ.आर.एस.खंडारे, डॉ. पी.आर. बांडे,डॉ.पी.डी.ठाकरे, प्रा. आर.एस.कणसे डॉ. आर. एस. गेडाम, तसेच शिक्षकेतर कर्मचारी वर्ग श्री नितेश कदम, श्री सचिन माटोडे,श्री सतीश सरतापे , श्री विनोद कंटाळे, श्री. सोमराज लोहकरे यांचे विशेष सहकार्य लाभले, त्याचबरोबर बी.ए भाग 1,2 आणि 3 मधील विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

Daily Amravati Darshan
Date14/10/2023

# जिजामाता कला महाविद्यालयामध्ये माहिती अधिकार जनजागृती सप्ताह साजरा

**दारव्हा( प्रतिनिधी / अमरावती दर्शन ):** स्थानिक जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथे दिनांक 6 ऑक्टोबर ते 12 ऑक्टोबर 2023 या कालावधीत माहिती अधिकार जनजागृती सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. माहितीचा अधिकार कायदा अधिनियम 2005 या कायद्याच्या सकारात्मक वापरासाठी विद्यार्थी वर्गात तसेच समाजात जनजागृती झाली पाहिजे. कारण फार मोठ्या मेहनतीने उपोषणे ,मोर्चे, संप, जन आंदोलने करून हा अधिकार शासनविरोधात भांडणे करून मोठ्या मेहनतीने मिळवलेला आहे . आज हा कायदा लागू होऊन 18 वर्षे पूर्ण झालेली आहेत. तरीसुद्धा अजूनही पाहिजे त्याप्रमाणात ग्रामीण भागातून अल्पशिक्षित जनतेत विद्यार्थी वर्गात या कायद्याविषयी जनजागृती झालेली नसल्यामुळे या कायद्याबाबत विद्यार्थी वर्गात जनजागृती व्हावी. या उद्देशातून दरवर्षी जिजामाता कला महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग मार्फत हा जनजागृती सप्ताह साजरा केला जातो माहितीचा अधिकार जनजागृती सप्ताह 2023 अंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्यात प्रामुख्याने निबंध स्पर्धा,पोस्टर स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा वादविवाद स्पर्धा ,वक्तृत्व स्पर्धा आणि दिनांक 11 ऑक्टोबर 2023 रोजी माहिती अधिकारावर अतिथी व्याख्यान डॉ.व्ही. एस इंगळे राज्यशास्त्र विभाग प्रमुख गोपिकाबाई गावंडे महाविद्यालय उमरखेड यांचे माहिती अधिकार कायद्या- महत्त्व , गैरप्रकार आणि उपायोजना या विषयावर व्याख्यान झाले .असे विविध कार्यक्रम राबवून विद्यार्थी वर्गात माहिती अधिकार अधिनियम 2005 या कायद्याविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला .

सर्व स्पर्धेत प्रथम व द्युटी येणाऱ्या विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान परीक्षेचे पुस्तक देऊन पारितोषक देऊन गौरव करण्यात येणार आहे . माहिती अधिकार जनजागृती सुद्धा 2023 अंतर्गत विविध कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. ए.पी जाधव आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. आर.यु.हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. जे.पी जुकरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्रा. डॉ.आर.एस.खंडारे, डॉ. पी.आर.बांडे,डॉ.पी.डी.ठाकरे, प्रा.आर.एस.कणसे डॉ. आर. एस. गेडाम, तसेच शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नितेश कदम, सचिन माटोडे, सतीश सरतापे , विनोद कंटाळे, सोमराज लोहकरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

Daily Vidharbh Kalyan
Date 10/10/2023

# मतदार साक्षरता क्लबची स्थापना



**विदर्भ कल्याण / दारव्हा**

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय येथील Electoral Literacy club (मतदार साक्षरता विभाग ) ची स्थापना करून उद्घाटनाचा कार्यक्रम घेणयात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्याल्याचे प्राचार्य डॉ. ए.पी. जाधव आणि या कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून आयक्युएसी समन्वयक डॉ रामधन हिरे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी आयोजक तथा क्लबचे प्रभारीप्रमुख तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. जयवंत जुकरे यांनी 2024 च्या सार्वत्रिक निवडणुका डोळया समोर ठेवून जास्तीत जास्त नागरिकांना मतदान प्रक्रियेत सहभागी होता यावे ,याकरिता महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांचे वय अठरा वर्षे पूर्ण झालेले आहे त्यांनी मतदान नोंदणी करावी .तसेच आपल्या गावात किंवा शेजारी अठरा वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांची नाव नोंदणी करून घेण्यासाठी क्लबच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा.शिवाय आधार कार्ड मतदान कार्ड असे लिंक करून घ्यावे, झोपडपट्टीतील व्यक्ती आणि वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिला तथा तृतीयपंथी हे जर हे जर आपल्या आजूबाजूला असतील तर त्यांना सुद्धा मतदान यादीत नाव नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करावे त्यांना माहिती द्यावी यासंदर्भात क्लबच्या सदस्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन डॉ.जे. पी. जुकरे यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता डॉ रमेश खंडारे डॉ. प्रीती ठाकरे डॉ. पुरुषोत्तम बांडे, प्रा. रूपाली कणसे डॉ.राजेश गेडाम नितेश कदम,सचिन माटोडे. सतीश सरतापे. विनोद कंटाळे सोमराज लोहकरे. कु.विशाखा कोल्हे, कु. साक्षी देशकरी कु. राणी घोडे कु. स्नेहल डांगरा कु. विशाखा कोल्हे कु.पायल राऊत कु.रवीना चव्हाण ,महेश चांदोडे कु.रिता गावंडे ,आदींनी परिश्रम घेतले.

Daily Prabuddh Parivar
25/1/2024

# जिजामाता कला महाविद्यालयात मतदार दिन संपन्न



नांदेड- स्थानिक नवसंजिवन शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागामार्फत निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये पोस्टर स्पर्धा जनजागृती रॅली आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.पी. जाधव हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून नायब तहसीलदार संजय जाधव हे उपस्थित होते, तर प्रमुख उपस्थितीमध्ये राजगडकर साहेब निवडणूक विभाग हे उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना संजय जाधव यांनी मानवी जीवनात मतदान किती महत्वाचे आहे यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणांमधून डॉ. जाधव यांनी मतदारांची टक्केवारी वाढली पाहिजे त्याकरता आपण जनजागृती केली पाहिजे यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन राणी घोडे केले तर प्रास्ताविक डॉक्टर जयवंत जुकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन विशाखा कोल्हे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रामधन हिरे डॉ. प्रीती ठाकरे डॉ. पुरुषोत्तम बांडे नितेश कदम सचिन माटोळे विनोद कंठाळे सोमराज लोहकरे सतीश सरतापे तेजस्विनी चव्हाण राणी जाधव अजय चव्हाण महेश चांदोळे हरीओम जामोद माधुरी राठोड रवीना चव्हाण रेवती चौधरी सानिका चौरे सृष्टी अगम गायत्री वानखडे अक्षय जयसिंगपूर पायल राऊत पायल चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

Daily Prabudd Parivar
Date 27/1/2024

# मतदान जनजागृती रॅली



नांदेड- नवसंजीन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग द्वारा मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. मतदानाच्या संदर्भात तरुणांमध्ये जनजागृती व्हावी व मताला किती महत्तु आहे याची जाणीव करून देण्यासाठी चौका चौकात पथनाट्य सादर करण्यात आली. ही रॅली झाशीची राणी चौक अंबिका नगर शिवाजीनगर बस स्थानक चौक आणि गोळीबार चौक तहसील पंचायत समिती चौक आदी भागातून फिरून बस स्थानक परिसरात समारोप करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. ए.पी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभाग प्रमुख डॉ. रामधन हिरे व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.कु. रूपाली कणसे डॉ. रमेश खंडारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता इतिहास विभागातील विद्यार्थी आणि महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी सहकार्य केले.

Daily Sinhzep
Date 12/2/2024

# पर्यावरण जनजागृती रॅली

**यवतमाळ**

**सिंहझेप प्रतिनिधी**



नवसंजिवन शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय द्वारा पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .ए.पी.जाधव आयक्युएसी समन्वयक डॉ. रामधन हिरे यांनी हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले. ही रॅली महाविद्यालय परिसरातून झाशीची राणी चौक, अंबिका नगर, शिवाजीनगर, शिवराज चौक, बस स्थानक चौक, गोळीबार चौक आदी भागातून जनजागृतीच्या संदर्भात पथनाट्य सादर करून ही रॅली काढण्यात आली. या रॅलीचा समारोप गोळीबार चौकात करण्यात आला.

या रॅलीच्या यशस्वीतेसाठी डॉ. रमेश खंडारे डॉ. जयवंत जुकरे डॉ. प्रीती ठाकरे डॉ. पुरुषोत्तम बांडे प्रा.कु. रूपाली कणसे नितेश कदम सचिन माटोळे विनोद कंठाळे सोमराज लोहकरे सतीश सरतापे तेजस्विनी चव्हाण राणी जाधव अजय चव्हाण महेश चांदोळे महेश चव्हाण प्रेम मनोहर प्रथमेश आडे माधुरी राठोड रवीना चव्हाण रेवती चौधरी सानिका चौरे सृष्टी अगम गायत्री वानखडे अक्षय जयसिंगपूर पायल राऊत

Jijamata Arts College ★ Darwha Dist.Yavatmal ★ 0454

Bhatare
Off.Principal
Jijamata Arts College
Darwha Dist.Yavatmal